# वार्षिक अहवाल

# २०२१ – २०२२





## आदिम संस्कृती अभ्यास,संशोधन विकास केंद्र

**(रजि.नं. महा १५१९ /२०११/पुणे)**

त्रिमूर्ती भवन, जुन्नर फाटा, घोडेगाव ता.आंबेगाव जि.पुणे - ४१० ५०९ संपर्क – ९४०५८५३४७८

ई-मेल - adimsanstha2012@gmail.com संकेतस्थळ - adimresearch.org

# कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | प्रा. शरद जनार्दन जावडेकर | अध्यक्ष |
| २. | प्रा.हनुमंत तथा राजीव भीमराव जोशी | उपाध्यक्ष |
| ३. | डॉ. अमोल पोपट वाघमारे | सचिव |
| ४. | गिरीश दगडूलाल गांधी | सदस्य |
| ५. | सुवर्णा अशोक पेकारी | सदस्य |
| ६. | प्रा.डॉ.हनुमंत लक्ष्मण भवारी | सदस्य |
| ७. | अड .नाथा कुमाजी शिंगाडे | सदस्य |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पान क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ४ |
| २. | साक्षरता व शिक्षण विषयक कार्यक्रम | ५ – ९ |
| ३. | कोविड -१९ विषयक कार्य | १० – १६ |
| ४. | परसबाग प्रकल्प | १७ – १८ |
| ५. | संशोधनात्मक कार्य | १९ – २३ |
| ६. | विशेष दिनानिमित्ताचे कार्यक्रम | २४ – २७ |
| ७. | मदतीचे व इतर कार्य | २८ – ३१ |
| ८. | वर्षभरातील साध्य बाबी | ३२ |

# प्रस्तावना

आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व विकास केंद्र ही संस्था आदिवासी, दलित व वंचित घटकांच्या सामाजिक शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कटिबद्ध असणारी संस्था आहे. संशोधन व अभ्यास या आधारे वंचित घटकांच्या विकासप्रक्रियेत सकारात्मक हस्तक्षेप संस्था करत आहे. या अनुषंगाने विविध उपक्रम, अभ्यास प्रकल्प संस्था सातत्याने करीत असते. या प्रक्रियेत समाजातील विविध अभ्यासू लोकांना सोबत घेऊन संस्था आपल्या उद्देशाच्या पूर्ततेसाठी कार्य करीत आहे.

सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करताना नक्कीच संस्थेला आनंद होत आहे. या वर्षांत आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, संशोधन या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात काम झालेले आहे.

या वर्षात या अशा अनेक प्रकल्पाबरोबरच सन २०२०-११ या वर्षात सुरु करण्यात आलेले १० ठिकाणी साक्षरता वर्ग याचे संयोजन व पर्यवेक्षण करून हा उपक्रम अधिक प्रभावशाली करण्यात नक्कीच यश प्राप्त झालेले आहे. साक्षरता वर्गाच्या माध्यमातून निरक्षर महिला-पुरुष यांच्यामध्ये कायदा साक्षरता, अंकगणित,आरोग्य या प्रकारची जाणीवजागृती राबवली जात आहे. या साक्षरता प्रकल्पाचे महत्त्वपूर्ण यश म्हणजे आदिवासी भागातील महिलांना एक आत्मभान देण्याचे कार्य हा प्रकल्प करत आहे. तसेच आदिवासी भागातील १० ठिकाणी ग्रंथालय देखील सुरू करण्यात आले आहेत.

अभ्यास, संशोधन व प्रत्यक्ष कृतिकार्यक्रम याधारे संस्थेचे आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात मुलभूत स्वरूपाचे काम सुरु आहे. या कामासाठी आम्हाला सहकार्य करणाऱ्या सर्व संस्था, सरकारी विभाग,व्यक्ती संघटना यांचे आम्ही ऋण व्यक्त करतो. व यापुढे हि मुलभूत व शाश्वत स्वरूपाचे काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न संस्था नक्कीच करेल, या आशावादासह हा वार्षिक अहवाल आम्ही मांडत आहोत.

**कार्यकारी मंडळ**
आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र

# साक्षरता व शिक्षण विषयक कार्यक्रम

## १. साक्षरता वर्ग प्रकल्प

रोटरी क्लब यांच्या सहाय्याने साक्षरता प्रकल्प या वर्षात सुरु करण्यात आले होते. या साक्षरता वर्गात लेखन, वाचनाबरोबर साक्षरता हि प्रदान केली जात आहे. या साक्षरता प्रकल्पाच्या अनुषंगाने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. व त्यानंतर या साक्षरता वर्गात साक्षरतेचे धडे प्रौढ महिला-पुरुष यांची राज्य साधन केंद्र पुणे या भारत सरकारच्या अधिकृत संस्थेच्या वतीने मुलभूत साक्षरता परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेच्या आधारे नवसाक्षर व स्वयंसेवक यांना प्रमाणपत्र हि वितरीत करण्यात आले.

**प्रकल्पाचा उद्देश**-

- आंबेगाव तालुक्यातील आदिवासी वाडी वस्तीवर साक्षरता वर्ग सुरु करून आदिवासी निरक्षर यांना साक्षर करणे.
- साक्षरता वर्गात लेखन, वाचन, अंकगणित याबरोबरच कायदा साक्षरता, आर्थिक, साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन साक्षरता व आरोग्य साक्षरता याविषयक मार्गदर्शन साक्षरता वर्गातील महिला-पुरुषांना देऊन त्यांना कायदेविषयक ज्ञान व माहिती सोप्या भाषेत देणे.
- साक्षरता वर्गातील महिला व पुरुष यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करून भारतीय राज्यघटनेने दिलेले मुलभूत हक्क व कर्तव्ये यांची त्यांना जाणीव करून देणे.
- साक्षरता वर्गाच्या माध्यमातून व्यक्तिगत व सामाजिक विकास प्रक्रियेला चालना देणे.
- गावाच्या ग्रामसभेत लोकांचा सकारात्मक हस्तक्षेप वाढवा यासाठीचे विविध माहिती देऊन साक्षरता वर्गातील महिलांना व पुरुषांना प्रशिक्षित करणे.

**या वर्षात ५ ठिकाणी साक्षरता वर्ग कार्यरत होते.ते पुढीलप्रमाणे** -

१. सायरटोला, गडचिरोली
२. पिंपरवाडी
३. कोलतावडे
४. खेतेपठार
५. मोहरेवाडी

**या वर्षाच्या अखेरीस सुरु झालेलं दोन नवीन साक्षरता वर्ग**

१.बराटे वस्ती,कर्वेनगर , पुणे
२. आमोंडी (ठाकरवस्ती)-

**१. साक्षरता वर्ग – सायरटोला, गडचिरोली**

गडचिरोली हा जिल्हा दुर्गम,आदिवासी व अविकसित म्हणून गणला जातो. प्रचंड नैसर्गिक साधनसंपत्ती , आदिवासी संस्कृती ही खासियत असून सदर जिल्हयामध्ये शिक्षण अर्थातच साक्षरता याचे प्रमाण अल्प आहे. ही गोष्ट साक्षरता अहवालामध्ये प्रकर्षाने जाणवते. सदरील गरज लक्षात घेता दि.६ फेब्रुवारी २०२१ रोजी सायरटोला(गडचिरोली ) येथे २० महिला व अनवरी सस्थेच्या मुख्य संस्थापक श्रीमती अनवरी शेख, शिक्षण अधिकारी श्री.खोब्रागडे यांच्या उपस्थितीत साक्षरता वर्ग सुरू झाला. तसेच वर्गासाठी लागत असणाऱ्या साहित्याचे वाटपही करण्यात आले .

प्रौढ साक्षरता वर्गाचा प्राथमिक उद्देश सामाजिक न्याय आणि समान प्रवेश मिळवण्यासाठी समाजातील गरीब किंवा इतर कारणांमुळे संधी गमवलेल्याना दुसरी संधी प्रदान करणे हा आहे.

**२ . साक्षरता वर्ग – पिंपरवाडी (आंबे हातविज)**

पिंपरवाडी येथे फेब्रुवारी २०२१ रोजी गावचे सरपंच मुकुंद घोडे व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत प्रौढ साक्षरता वर्गाचा उद्घाटन सोहळा पार पडला. स्वयंसेविका आरती बबन घोडे हिने वर्गातील सर्व प्रौढ व्यक्तींना अक्षर ओळख, अंक ओळख तसेच लिहायला व वाचायला शिकवले. सुरूवातीस अनेक अडचणी आल्या जसे की लक्षात न राहणे, नियमित शिकवणीस न येणे कोरोना असल्यामुळे घराबाहेर न पडणे इत्यादी तरीही या अडचणींवर मात करत हा वर्ग सुरु राहिला. साधारणता हा साक्षरता वर्ग ६ महीने चालला या काळात महिलांचे सकारात्मक प्रतिसाद प्रकर्षाने जाणवले.या साक्षरता वर्गामध्ये कोरोना बाबत वैज्ञानिक जनजागृती करण्यात आली .

'सुरुवातीस आम्ही येण्यास उत्सुक नव्हतो, मात्र आरतीने आम्हाला वर्गात येण्याच आणि शिकण्याच महत्व पटवून दिल्याने आम्ही येऊ लागलो आहोत. आत्ता शिकतांना नवनवीन गोष्टीची माहिती मिळत असते.' **सुनिता जनार्दन डामसे**

**३. साक्षरता वर्ग - कोलतावडे**

कोलतावडे येथे दि.१२ फेब्रुवारी २०२१ रोजी सीता किर्वे यांच्या घरामध्ये गावातील सर्व महिला, विद्यार्थी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत प्रौढ साक्षरता वर्गाचे उद्घाटन झाले. यावेळी आदिम संस्थेचे अनिल सुपे व अविनाश गवारी उपस्थित होते.

सदर प्रौढ साक्षरता वर्गामध्ये २५ प्रौढ महिलांनी शिक्षण घेतले. सुरूवातीस त्यांना स्वत:चे नावही लिहिता किंवा वाचता येत नव्हते. परंतु साक्षरता वर्ग संपल्यानंतर सर्व जन खूप चांगल्या पद्धतींनी लिहायला व वाचयला लागले आहेत. यासाठी स्वयंसेविका सीमा किर्वे यांनी सदर ठिकाणी शिकवणीचे काम केले.

या वर्गामध्ये शिवजयंती , सावित्रीबाई फुले पुण्यतिथी साजरी करणे असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. या उपक्रमामुळे सर्व महिलांना अंक ओळख, अक्षर ओळख झाली व त्यांना लिहिता व वाचता येऊ लागले.




**४. साक्षरता वर्ग - खेतेपठार**

आंबेगाव तालुक्यातील खेतेपठार या गुर्गम भागात जेथे येण्या –जाण्यासाठी रस्ता देखील नाही. अशा ठिकाणी साक्षरता वर्ग दि.१० मार्च २०२१ रोजी सुरू झाला. सुरूवातीस अनुकूल प्रातिसाद नव्हता, परंतु महिला नियमित याव्यात यासाठी गाणी म्हणणे, खेळ घेणे इत्यादी असे करमणुकीचे कार्यक्रम घेतले गेले.

कोरोना मध्ये जनजागृती करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय घोडेगाव येथील मदतकक्षाची पत्रके व कोरोना लसीकरणासाठी पत्रके वाटप करून जनजागृती करण्यात आली. या वर्गात १५ महिला साक्षर झाल्या. या साक्षरता वर्गाचा फायदा झाला व त्यांना लिहिता व वाचता येऊ लागले आहे.

**५. साक्षरता वर्ग – मोहरेवाडी**

या दि.८ मार्च २०२१ रोजी महिला दिनाचे औचित्य साधून सरपंच सौ.मनीषा नंदकर यांच्या उपस्थितीत सदर वर्गाचे उद्घाटन झाले. रोशनी अनाजी मोहरे या स्वयंसेविकेने सर्व साक्षरता वर्ग सांभाळला व शिकवणीचे काम केले तसेच कोरोना विषयी जन जागृती करण्यात आली. सुरूवातीस अनेक अडचणी आल्या जसे की कोरोनाची भीती, घरातून येणारे अडथळे परंतु यावर मात करून २३ महिलांनी साक्षरता वर्गात प्रशिक्षण घेतले.

**६. साक्षरता वर्ग – बराटेचाळ, कर्वेनगर**

पुणे शहरात वस्तीपातळीवर एक साक्षरता वर्ग रोटरी क्लब पुणे मेट्रो यांच्या सहाय्याने दि.२ फेब्रुवारी २०२२ रोजी सुरू केला. कर्वेनगर येथील बराटेचाळ येथे इंद्राणी इंगळे या स्वयंसेविकेने साक्षरता वर्गात शिकवण्याचे काम केले. सदर वर्गात मूलभूत साक्षरते बरोबरच आर्थिक, कायदेविषयक साक्षरतेचे धडे देण्यात आले. तसेच डॉ.अमोल वाघमारे यांनी ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण देण्याचे काम केले. शिक्षणाबद्दल गोडी वाढवण्यासाठी काही विशिष्ट खेळ घेण्यात आले . हळदी - कुंकू च कार्यक्रम घेतला व शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.



# २. ग्रंथालय उभारणी

संस्थेने २०२१-२०२२ या काळामध्ये एकूण १० ग्रंथालयांची उभारणी आंबेगाव, शिरूर व खेड या तीन तालुक्यांमध्ये केली. सदर ग्रंथालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिकेची व्यवस्था देखील करण्यात आली व त्यामध्ये विविध विषयांवर आधारित वाचनासाठी अनेक पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. प्रत्येक ग्रंथालयाच्या ठिकाणी ग्रंथालय व्यवस्थापनासाठी स्थानिक विद्यार्थी व तरुण यांना सोबत घेऊन स्थानिक समिती स्थापन केली.

आदिवासी दुर्गम भागामध्ये संस्थेच्या वतीने अनेकदा गरजू लोकांमध्ये शैक्षणिक साहित्य जसे की वही, पुस्तक, पेन, कंपास पेटी, दप्तर इत्यादी साहित्याचे यांचे वाटप केले. आर्थिकदृष्ट्या मागास लोकांमध्ये व दुर्गम भागामध्ये शिक्षणाला प्रोत्साहन देणे, साक्षरता वाढीस लावणे तसेच शिक्षणासाठी इतर मदत आदिम संस्था करते.

या ग्रंथालय उभारणीमागे संस्थेचे हे उद्देश होते.

- तरुण व प्रौढ यांमध्ये वाचन चळवळी रुजवणे.
- शिक्षणाचा प्रसार करून साक्षरतेला प्रोत्साहन देणे.
- ग्रंथालयांचे महत्व पटवून देणे व प्रचार करणे.
- सर्व नागरिकांना स्वयंशिक्षणासाठी मदत करणे.
- कायदा , राजकीय , आर्थिक साक्षरता रुजविणे.
- ग्रामीण भागा पर्यंत शिक्षण पोहोचविणे .

**ग्रंथालयांची ठिकाणे** :

१. बांबळेवाडी
२. आपटी
३. फुलवडे
४. अवसरी
५. कान्हेवाडी
६. गंगापूर
७. बोरघर
८. घोडेगाव

# कोविड - १९ विषयक कार्य

- कोरोना जाणीवजागृती
- जीवनावश्यक साहित्याचे वाटप
- १०० किराणा किट वाटप आमोंडी व जांभोरी
- ३५ कुटुंबांना किराणा किट वाटप

# १. कोरोना जाणीवजागृती

कोविड -१९ मुळे जगभरात हाहाकार माजला असताना, खेड, जुन्नर, आंबेगाव, शिरूर या ३ तालुक्यांच्या आदिवासी भागात कोरोना बाबत जाणीवजागृती केली. तसेच आरोग्यविषयक काळजी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले.

**प्रकल्पाचा उद्देश** :

- कोरोना संदर्भात शास्त्रीय दृष्टीकोणातून जनजागृती करणे .
- कोरोना नियमांची अमलबजावणी साठी अपेक्षित सहाय्य करणे .
- कोरोना प्रतिबंधित लसीचे महत्त्व पटवून देणे व शासकीय अधिकारीवर्गाला याबाबत सहाय्य करणे.

कोरोना हा आजार आदिवासी भागामध्ये पाय पसरू लागला असताना त्यावर उपाययोजना करण्याची गरज प्रकर्षाने जाणवली. आजही आदिवासी वाड्या वस्त्यांवर आरोग्य उपकेंद्र नाहीत. तसेच खासगी दवाखाने यांचीसुद्धा उपलब्धता नाही. त्यामुळे "prevention is better than cure' या युक्तिस अनुसरून संस्थेने सदर विषयावर काम केले. ज्यामुळे आदिवासी भागामध्ये कोरोना ची झळ कमी प्रमाणात बसली.

कोरोना-१९ च्या पार्श्वभूमीवर लोकांमध्ये सातत्यपूर्वक जाणीवजागृती करणे गरजेचे होते. विशेषतः लसीकरणाविषयी लोकांच्या मनात असलेले गैरसमज दूर करणे गरजेचे होते. या पार्श्वभूमीवर कोरोना विषयक विविध मुद्यांवर माहिती देणे व लोकांच्या मनातील शंकाचे निरसन करणे यासाठी कोरोना जाणीव-जागृती कार्यक्रम आयोजित केला होता. दि.२८ ते दि.३० एप्रिल या दरम्यान हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन दि.२८ एप्रिल २०२१ रोजी घोडेगाव येथे करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी जालिंदर पठारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हा कार्यक्रम पंचायत समिती,घोडेगाव येथे पार पडला. यावेळी या कार्यक्रमामागची भूमिका संस्थेचे सचिव डॉ.अमोल वाघमारे यांनी विषद केली. यानंतर हा जाणीवजागृती कार्यक्रम सुरु झाला.

या कार्यक्रमात शहीद राजगुरू ग्रंथालयाची रुग्णवाहिका होती.या रुग्णवाहिकेला स्पीकर लावण्यात आला होता.प्रत्येक गावात व वाडी-वस्तीवर ही गाडी गेल्यानंतर स्पीकरवरून कोरोना विषयी माहिती सांगितली जात होती. यामध्ये लसीकरण करा,लसीकरणाचे महत्त्व, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर योग्य ती काळजी घ्या व कोणताही आजार अंगावर काढू नये, अशा प्रकारचे संदेश देण्यात आले. याचवेळी गावातील घरोघरी लसीकरणाचे महत्त्व सांगणारी छोटी पुस्तिका संस्थेचे कार्यकर्ते घरी जावून देत होते. ही पुस्तिका कोविड जनविरोधी अभियान यांनी प्रकाशित करून दिली होती व या अभियानाचे किरण मोघे यांनी ही उपलब्ध करून दिली होती. यावेळी लोकांची सोबत विशिष्ट अंतर ठेवून त्यांच्या मनातील शंका दुर केल्या जात होत्या.

दि.२८ एप्रिल २०२१ या दिवशी खालील गावात कोरोना विषयक जाणीव-जागृती करण्यात आली होती. शिनोली,डिंभे,गोहे बु,गोहे खु या दोन्ही गावातील वाड्या-वस्त्या यांनतर राजेवाडी व

राजेवाडीच्या वाड्या वस्त्या,पोखरी व पोखरीच्या वाड्या-वस्त्या, निगडाळे, तेरुंगण, म्हातारबाचीवाडी, राजपूर, गाडेवाडी, तळेघर इ.गावात हा कार्यक्रम पार पडला.

दि.२९ एप्रिल २०२१ या दिवशी खालील गावात कार्यक्रम पार पडला.पिंपरी, म्हाळुंगे तर्फे आंबेगाव, पाटण,कुशिरे बुद्रुक, कुशिरे खुर्द, भोईरवाडी, कोंढरे, तिरपाड, आघाणे, डोण, आसाणे, बोरघर, फुलवडे इ. गावांत व या गावांच्या वाडी – वस्त्यांमध्ये कोरोना विषयी जाणीवजागृती करण्यात आली.

दि.३० एप्रिल २०२१ या शेवटच्या दिवशी खालील गावात कार्यक्रम पार पडला. जांभोरी, तळेघर, चिखली, फलोदे इ. गावांत व या गावांच्या वाडी – वस्त्यांमध्ये कोरोना विषयी जाणीवजागृती करण्यात आली.

साध्य बाबी-

- आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील सुमारे ३५ वाड्या-वस्त्या,येथील लोकांमध्ये कोरोना विषयक माहिती देण्यात आली.
- या कार्यक्रमामुळे अनेक लोकांचे लसीकरण विषयक मनातील गैरसमज दुर होण्यास मदत झाली.
- या जाणीव-जागृती कार्यक्रमामुळे ज्या लोकांनी लसीकरण केले नव्हते ती लोक लसीकरण करून घेण्यास तयार झाली.






# २. जीवनावश्यक साहित्याचे वाटप

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर मागील वर्षभर देशभरातील श्रमिकांची,गरीब कुटुंबाची दयनीय स्थिती आहे. अनेक कुटुंबाना दोन वेळेस जेवनाची भ्रांत पडते, अशी परिस्थिती सद्यकालीन होती. या पार्श्वभूमीवर विविध सामाजिक संस्था, व्यक्ती, सामाजिक उत्तरदायी माननाऱ्या कंपन्या या पुढे येत होत्या. या पार्श्वभूमीवर कुकॉइन या कंपनीच्या सहकार्याने व आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र या संस्थेच्या स्थानिक संयोजनातून पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात ३५० आदिवासी कुटुंबाना किराणा मालाचे साहित्य वाटप करण्यात आले.

सदरील ३५० आदिवासी कुटुंबाना त्यांच्या घरी जावून,त्यांच्या वस्तीवर जावून दि.२०-२१-२२ मे,२०२१ या तीन दिवसाच्या कालखंडात वाटप करण्यात आले.सदरील आदिवासी कुटुंबाना दिल्या गेलेल्या किराणा कीटमध्ये खालील वस्तूंचा समावेश होता.

१. बाजरी – ५ कि.ग्रा
२. गोडेतेल – २ कि.ग्रा
३. मुग डाळ – १ कि.ग्रा
४. गुळ – १ कि.ग्रा
५. चहापावडर – २०० ग्राम
६. चणापीठ – १ कि.ग्रा
७. शेंगदाणा – १ कि.ग्रा
८. तूर डाळ – १ कि.ग्रा
९. वाटणा – १ कि.ग्रा
१०. मीठ पुडा- १ कि.ग्रा
११. मटकी १कि.ग्रा

असे ११ वस्तूंचे एक कीट तयार करण्यात आले होते. एका कीटचे वजन १६ किलो होते.पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील २७ गावे, वाड्या-वस्त्या येथे जीवनावश्यक किराणा कीट वाटप करण्यात आले. राजपूर, जांभोरी, चिखली, फलोदे, तळेघर, गोहे खु., गोहे बु., फुलवडे, बोरघर, डिंभे, आडिवरे , न्हावेड, आगाणे, तिरपाड, वचपे, खेतेपठार, आपटी, गंगापूर, जुने आंबेगाव, नांदूरकीचीवाडी, असाने, पाटण, माळीन, कुशिरे बु, साकेरी, पिंपरगणे, भीमाशंकर इ.गावातील गरजूंना हे कीट त्यांच्या गावात व घरी जाऊन वाटप करण्यात आले.

**निरीक्षणे** –

- चक्रीवादळाने अनेक कुटुंबाचे नुकसान झाले होते, त्याच दरम्यान ही मदत दिली गेल्याने, लोकांना नक्कीच या जीवनावश्यक वस्तूंचा, त्यांच्या उदरनिर्वाह करिता अत्यंत उपयोग झालेला आहे.
- किराणा कीट मध्ये डाळ व कडधान्ये दिल्याने अनेक महिलांनी धन्यावद व्यक्त केले त्यांच्या भाजीचा प्रश्न काहीं अंशी सुटण्यास मदत झाली.
- जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करतेवेळी कोविड-१९ च्या सर्व नियमांचे पालन करण्यात आले होते. हे जीवनावश्यक कीट वाटप करताना नागरिकांनी कोविड-१९ पासून बचाव करण्यासाठी कोण-कोणती काळजी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.





# ३. १०० किराणा किट वाटप आमोंडी व जांभोरी

पुण्यातील एका सामाजिक संस्थेच्या मदतीने जांभोरी गावातील गरजू कुटुंबे व आदिवासी ठाकर समाजातील अमोंडी या गावातील कुटुंबे यांना किराणा मालाचे कीट वाटप करण्यात आले. या कीटमध्ये जवळपास १००० रुपयापेक्षा जास्त किमतींचा किराणा माल देण्यात आला.

# ४. ३५ कुटुंबांना किराणा किट वाटप

भीमाशंकर येथील अत्यंत दुर्गम भागातील पदरवाडी येथे सुमारे पस्तीस कुटुंबाना आदिम संस्थेच्या वतीने किराणा मालाचे वाटप करण्यात आले.भीमाशंकर येथील पदरवाडी ही अत्यंत दुर्गम भागात वसलेली वस्ती आहे.या वस्तीतील नागरीकांची उपजीविका ही मुख्यतःभीमाशंकर देवस्थानावर निर्भर असल्याने या लोकांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती.कारण भीमाशंकर हे मंदिर बंद असल्या कारणाने ही परिस्थती निर्माण झाली होती.या पार्श्वभूमीवर संस्थेच्या वतीने हे किराणा मालाचे साहित्य वाटप करण्यात आले.

# परसबाग प्रकल्प

## १. परसबाग बियाणे वाटप कार्यक्रम

सेंद्रिय भाजीपाला निर्मिती करून कुटुंबाकरता विषमुक्त भाजीपाला उत्पादित करता यावा, याकरिता आदिम संस्था व किसान सभेमार्फत परसबाग लागवडीकरिता महिलांना बीज वाटप करण्यात आले.

प्रकल्पाचा उद्देश-

- सेंद्रिय भाजीपाला निर्मितीसाठी सहाय्य करणे .
- देशी बियनांना प्रोत्साहन देणे .
- घरातच भाजीपाला व इतर गोष्टींची उपलब्धता करण्यास मदत करून देणे .

**माहिती** -

सध्या आदिवासी भागातही रसायनिक किटकनाशके व खते यांचा वापर वाढला आहे , त्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवल्या आहेत . तसेच यामुळे पाणी , मृदा प्रदूषण सुद्धा होते आणि हायब्रिड प्रकारच्या बियाणांमुळे देशी बियांनाना हानी पोहचते.

सेंद्रिय भाजीपाला निर्मिती करुन कुटुंबाकरिता विषमुक्त भाजीपाला उत्पादन करता यावा, याकरिता आदिम संस्था व किसान सभेमार्फत परसबाग लागवडी करिता महिलांना डॉ.अमोल वाघमारे व अशोक पेकारी यांनी माहिती देऊन बीज वाटप केले होते. आज सर्वच शेतकरी शेतीतील उत्पादन वाढविणेकरिता रासायनीक खते, किटकनाशके वापरत आहेत, त्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत, आदिवासी क्षेत्रात शेनखत व युरियाचा वापर होत आहे. शेतकऱ्यांच्या कुटुंबाकरिता लागणारा भाजीपाला आपल्या घरजवळ परसबागेत करता यावा, या करिता सेंद्रिय चांगले दर्जाचे विविध भाज्यांचे बीज आदिमसंस्थेमार्फत १०६ महिलांना वाटप केले.

या वेळी मार्गदर्शन करताना डॉ वाघमारे म्हणाले, शेंद्रिय शेती हि काळाची गरज आहे. रासायनिक खतांचा वापर बंद करा व शेणखत, गांडुळ खता- चा वापर करा असे सांगितले. जागतिक अन्न दिनानिमित्त परसबागेसाठी देशी बियाणे उप-लब्ध करून देणेसाठी श्रीमती दिपाताई मोरे यांनी मदत केली होती. परसबागेविषयक सविस्तर माहिती व त्याविषयक जाणीवजागृती विषयक अभ्यास साहित्य, प्रशिक्षण हे सहाय्यक ट्रस्ट, मुंबई यांचेकडून आदीम संस्थेस उपलब्ध झाले होते. या परसबाग बियाणे वाटप कार्यक्रमप्रसंगी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे माजी उपकुलसचिव श्री. सीताराम जोशी, आदीम संस्थेचे डॉ. अमोल वाघमारे, अनिल सुपे, किसान सभेचे अशोक पेकारी, विठ्ठल सुपे, मंगेश जोशी, विजय दांगट, इ. उपस्थित होते.





# संशोधनात्मक कार्य

- ठाकर समाज सर्वेक्षण व अभ्यास अहवाल
- ठाकर समाज अभ्यास अहवालावर चर्चा
- पेसा कायदा अंमलबजावणी विषयक सर्वेक्षण
- अहवाल लेखन कार्यशाळा

# १. ठाकर समाज सर्वेक्षण व अभ्यास अहवाल -

आदिवासी समाजातील ठाकर समाज हा अत्यंत वंचित असा समाज आहे.या समाजाचे अत्यंत मुलभूत असे प्रश्न आहेत.या समाजाचा मुलभूत अभ्यास करून काही ठोस निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला गेला.जून २०२१ मध्ये आंबेगाव तालुक्यातील १३ गावांमधील ठाकर वस्त्यांमधील २९८ कुटुंबाची सर्वेक्षणासाठी निवड केली.आंबेगाव तालुक्यातील आदिवासी ठाकर जमातीच्या सामाजिक,आर्थिक समाज जीवनाचा अभ्यास करणे.ठाकर जमातीचा शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.आदिवासींच्या विकासासाठी शासकीय योजना आणि त्यांची फलनिष्पतीचा अभ्यास करणे.ही काही उद्दिष्ट्ये समोर ठेवून हे सर्वेक्षण केले गेले.सदर अभ्यासात वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे.

ठाकर समाजाच्या सामाजिक,आर्थिक, राजकीय स्थितीचे वर्णन या अभ्यासातून केले.नेहा बांबळे, आशा लोहकरे, अनुजा असवले, निकिता गायकवाड, प्रा.स्नेहल साबळे, संचिता खेबडे,समीर गारे, अभिषेक घोडेकर, अंकिता ढमढेरे या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवीवृत्तीने हे सर्वेक्षण केले.तर अहवाल लेखनाचे काम किरण लोहकरे व प्रा.स्नेहल साबळे यांनी केले.





## २. ठाकर समाज अभ्यास अहवालावर चर्चा

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधत दि.९ ऑगस्ट २०२२ रोजी आदिम संस्था व एस.एम.जोशी सोशालिस्ट फौंडेशन यांच्या एकत्रित संयोजनातून एस.एम.जोशी सभाग्रह, पुणे येथे ठाकर समाज अभ्यास अहवाल चर्चेचा कार्यक्रम पार पडला. या कार्यकमात जेष्ठ सामजिक कार्यकर्त्या सुरेखा दळवी, सामजिक कार्यकर्ते सुभाष वारे व नाथा शिंगाडे यांनी ठाकर समाजावर संस्थेने जो अभ्यास केला होता, त्यावर मांडणी केली. हा कार्यक्रम पुण्यात घेवूनही या कार्यक्रमाला चांगली उपस्थिती होती.



# ३. पेसा कायदा अंमलबजावणी विषयक सर्वेक्षण

नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी (NCAS) व आदिम संस्कृती अभ्यास,संशोधन व मानव विकास केंद्र,आंबेगाव या दोन संस्थांच्या वतीने,पुणे जिल्ह्यातील आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील पेसा कायदा लागू असलेल्या सुमारे ८३ गावांत पेसा कायदा अंमलबजावणी विषयक अभ्यास करण्यात आलेला होता. यासाठी सुमारे ८३ गावातील, प्रातिनिधिक ग्रामस्थ यांच्यासोबत संवाद साधून व व्यक्तीगत सुमारे ४३६ नागरिकांसोबत चर्चा करून, पेसा कायद्याची अंमलबजावणी विषयक सद्यस्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे.





# ४. अहवाल लेखन ऑनलाईन कार्यशाळा

दि.१८ एप्रिल २०२१ अहवाल लेखन कसे करावे या विषयावर कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. कार्यकर्त्यांची समज ओळखून अहवाल कसे करावे याचे ज्ञान कार्यकर्त्यांना व्हावे यासाठी हि कार्यशाळा ऑनलाईन गुगल वर आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे वक्ते डॉ अमोल वाघमारे व किरण लोहकरे हे होते. यावेळी आशा वायाळ, अशोक जोशी, स्नेहल साबळे, समीर गारे, नवनाथ मोरे, अनिल सुपे, अर्चना गवारी, अविनाश गवारी, मंगल तळपे, आशा लोहकरे इत्यादी उपस्थित होते.

अहवाल लेखन कसे असावे यावर डॉ अमोल वाघमारे सर यांनी सुरुवातीला अहवालाचे प्रकार सांगितले. यामध्ये चौकशी अहवाल, विविध कार्यक्रम अहवाल, सामाजिक अहवाल. आपण अहवाल कसे लिहितो यावरून त्या संस्थेची, संघटनेची वाटचाल ठरत असते. आपण अहवाल लिहितो म्हणजे इतिहास लिहित असतो.आपला अहवाल तिसरी पार्टी वाचणार असेल तर आपल्या भागाची पार्श्वभूमी, व्यक्तींची माहिती यांचा संदर्भ द्यावा लागतो.वाचक कोण असणार हे डोळ्यासमोर ठेवून अहवाल लेखन करावे. डॉ अमोल वाघमारे यांनी पुढे एक उदाहरणातून पटवून दिले. कोरोना जाणीवजागृती अभियान कसे झाले याबाबतीत जगभरातील परिस्थिती, सामाजिक भान, हेतू, उद्देश, यापद्धतीने मुद्दे लिहिणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे वृत्तांत, घटनाक्रम, अडचणी,निरीक्षणे, त्रुटी नोंदवणे गरजेचे असते. निरीक्षणांमध्ये कार्यक्रमाच्या अगोदरची, कार्यक्रमाच्या वेळची, कार्याक्रमानंतरची, कार्यक्रमातून काय साध्य झाल हे त्याचवेळी नोंदवावे. अहवालाची भाषा साधी व सरळ असावी, त्यात कवितेच्या चारोळ्या, म्हणी, वाक्प्रचार टाळावेत. जे गह्द्लाय जस घडलंय तसच लिहाव. आवश्यकतेनुसार चार्ट, तक्ते वापरावेत. अहवाल हा सारांश रूपाने संक्षिप्त झाला पाहिजे त्यात व्यक्तीचे नाव,पद, घटनाक्रम चुकवू नये. वक्त्याने दिलेले मत जसेच्या तसे मांडावे. जे झालय तेच लिहावे, अहवाल हा विस्कळीत नसावा. आवश्यकतेनुसार अहवालात दुरुस्त्या कराव्यात.

अहवाल सुरेख व चांगला होण्यासाठी घडलेल्या घटना तेथेच नोंदवहीत नोंदवून ठेवणे, निरीक्षणे नोंदवणे, छोटे मुद्दे नोंदवणे. कार्यक्रमानंतर अहवालाचे लेखन लवकर करावे. कार्यक्रमाला उपस्थितांच्या सह्या, नावे, इमेल, संपर्क क्रमांक, कार्यक्रमातील महत्वाचे फोटो यांची यादी जोडून ठेवली पाहिजे. अहवाल लेखन हे पुढील प्रकारे असावे. प्रस्थावना, पार्श्वभूमी, हेतू, स्वरूप, उद्देश, कार्यक्रमाच्या मुलभुत नोंदी, प्रत्यक्ष वृतांत, त्रुटी, अडचणी, निष्कर्ष याप्रमाणे असावा.

किरण लोहकरे सर यांनी अहवाल लेखन कसे करावे यामध्ये भर घातली. त्यांनी अहवालाची मुद्देसूद मांडणी असावी, अहवालाचा मथळा/टायटल आकर्षित करणारे व महत्वाचे असते. आपला अप्रोच हा अहवाल लिहिताना सकारात्मक असावा. आशा रीतीने त्यांनी मार्गदर्शन केले.

दोन्ही वक्त्यांनी अतिशय महत्वपूर्ण माहिती श्रोत्यांना दिली. या कार्यक्रमाचे संयोजन आदिम संस्था यांनी केले. या कार्यक्रमावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर गारे यांनी केले व सर्वांचे आभार अनिल सुपे यांनी केले.

# विशेष दिनानिमित्ताचे कार्यक्रम

- डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी
- महापरिनिर्वाण दिन
- जागतिक परिचारिका दिन
- शिवरायांच्या विचारांबाबत गटचर्चा
- बिरसा मुंडा स्मृतिदिन

# १. डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

दि.१४ एप्रिल २०२१ रोजी संस्थेच्या कार्यालयात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजही आदर्श ठरत आहेत. त्यांच्या  विचारांना उजाळा देण्यासाठी संस्था नेहमी या प्रकारचे उपक्रम राबवत असते. यावेळी समीर गारे, अविनाश गवारी हे उपस्थित होते.



# २. महापरिनिर्वाण दिन

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधत संस्थेच्या वतीने आंबेगाव तालुक्यातील ४ आदिवासी कातकरी वस्तीवर शिक्षण घेत असलेल्या सुमारे ५० शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच यावेळी डॉ.बाबासाहेब यांचे प्रसिद्ध व प्रेरणादायी भाषण  'विद्यार्थ्यानों जागृत व्हा!' या भाषणाच्या प्रतींचे वाटप केले. यावेळी संस्थेचे राजू घोडे, दिपक वालकोळी, अविनाश गवारी हे उपस्थित होते.





# ३. जागतिक परिचारिका दिन

जागतिक परिचारिका दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय,घोडेगाव येथे परिचारिका म्हणुन काम करत असणाऱ्या ज्योती वाळुंज यांचा डॉ.सुवर्णा काळे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी ज्योती वाळुंज यांना सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा,पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. जगभरात कोरोना आजाराने थैमान घातलेले असताना परिचारिका, रुग्णांना सेवा देत त्यांना आधार देण्याचे काम, प्रामुख्याने त्यांनी केले होते. ग्रामीण रुग्णालयात परिचारिका म्हणुन काम करताना ज्योती वाळुंज या आपली जबाबदारी पार पाडत असतानाच, त्यांनी माणुसकीचे नाते जपत एका वर्षाच्या मुलीवर हृदयाची शस्त्रक्रिया करण्यासाठी मदतकक्ष व रुग्णालय यांच्यासोबत सातत्याने संवाद ठेवून, पाठपुरावा करून आज त्या छोट्याशा मुलीला नवीन आयुष्य मिळवून दिले आहे. याबरोबरच हॉस्पिटलमध्ये आपली जबाबदारी पार पाडत असताना रुग्णांसोबत जिव्हाळ्याच नात त्या जपत आहेत. त्यांच्या या कामाची दखल घेऊन किसान सभा,आंबेगाव तालुका समिती, एस.एफ.आय.आंबेगाव तालुका व आदिम संस्था यांनी त्यांना घोडेगाव येथे त्यांना सन्मानित केले आहे. या छोट्याश्या कार्यक्रमावेळी दै.लोकमतचे पत्रकार निलेश कान्नव , किसान सभेचे राजू घोडे, एस. एफ. आय. चे अविनाश गवारी, समीर गारे आदिम संस्थेचे अर्चना गवारी, अनिल सुपे हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे संयोजन समीर गारे,अनिल सुपे,अविनाश गवारी,महेश गाडेकर यांनी केले होते.





## ४. शिवरायांच्या विचारांबाबत गटचर्चा

शिवजयंतीनिमित्त संस्थेच्या कार्यालयात शिवरायांच्या प्रतिमेला अभिवादन करून गटचर्चा करण्यात आली. सद्यस्थितीत शिवाजी महाराज यांच्या विचारांचा वारसा जोपासण्याबाबत उपस्थितांमध्ये गटचर्चा करण्यात आली. यावेळी किसान सभेचे उपाध्यक्ष राजू घोडे म्हणाले की ‘आजच्या लोकशाही व्यवस्थेत राजेशाही व्यवस्थेतील एका राजाची गरज वाटावी. यातच त्या राजाचे कर्तृत्व सामावले आहे. शिवरायांचे मानवतेच मूल्य आपण अंगीकारले पाहिजे. महापुरुषांच्या जयंत्या नाचून नव्हे, तर वाचून साजऱ्या करायला हव्यात.’ यावेळी आदिम संस्थेचे नंदन लोंढे, दिव्या जाधव, भारती बाळापुरे, किसान सभा आंबेगाव तालुका उपाध्यक्ष राजू घोडे, एसएफआय पुणे जिल्हा अध्यक्ष अविनाश गवारी, एसएफआय राज्य समिती सदस्य विलास साबळे, मोहन बांबळे, विशाखा बांबळे आदी उपस्थित होते.

## ५. बिरसा मुंडा स्मृतिदिन

दिनांक ९ जून २०२१ रोजी, संस्थेच्या कार्यालयात, आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा,यांच्या स्मृतीदिना निमित्त त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी संस्थेचे राजू घोडे,अविनाश गवारी, अर्जुन काळे इ.उपस्थित होते.

## मदतीचे व इतर कार्य

- आदिवासी साहित्यासाठीचा डॉ. गोविंद गारे पुरस्कार पुन्हा सुरू करण्याची मागणी
- आदिवासी ठाकर समुदायातील नागरिकांना जातीचे दाखले वाटप
- अन्न सुरक्षा कायदा प्रशिक्षण

# १. आदिवासी साहित्यासाठीचा डॉ. गारे पुरस्कार पुन्हा सुरू करण्याची मागणी

आदिवासी साहित्याची निर्मिती ही प्रारंभिक कालखंडात मौखिक साहित्यातून झाली व अलीकडील दशकात लिखित स्वरूपात आदिवासी साहित्य व्यक्त होऊ लागले. मात्र या साहित्यासाठी डॉ. गोविंद गारे या नावाने दिला जाणारा पुरस्कार शासनाने बंद केला असून आदिवासी साहित्यिकांना लेखनासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून हा पुरस्कार पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभागाच्या २३ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयानुसार स्व. यशवंतराव चव्हाण, राज्य वाङमय पुरस्कार योजनेअंतर्गत उत्कृष्ट आदिवासी साहित्याला डॉ. गोविंद गारे यांच्या नावाने साहित्य पुरस्कार देण्याचे जाहीर करण्यात आले होते. परंतु ७ डिसेंबर २०१९ च्या भाषा विभागाच्या शासन निर्णयाने हा पुरस्कार देण्याचे थांबविण्यात आले आहे. राज्यभर अनेक आदिवासी साहित्य संमेलने होऊन, आदिवासी साहित्याचा ठसा मराठी भाषेत उमटला जाऊ लागला आहे. आदिवासींच्या ४५ जमाती व ७४ बोली भाषांची वेगळी ओळख आहे. मात्र आदिवासी साहित्य, शासन स्तरावर उपेक्षितच राहिले आहे. साहित्य वर्तुळात आदिवासी साहित्याची फारशी दखल घेतली गेली नाही. जसजशी आदिवासी समाजात अक्षरओळख झाली, तसतसे आदिवासी समाजातील साहित्यिक लिहिते झाले आहेत.

मात्र महाराष्ट्र शासनाने आदिवासी साहित्याचा समावेश उपेक्षितांचे साहित्यात केलेला आहे आदिवासी साहित्याचे स्वतंत्र अस्तित्व मान्य न करता त्याचा समावेश इतरत्र करणे हा आदिवासी साहित्यावर अन्याय झाल्याची भावना साहित्यिकांमध्ये होऊ लागली आहे. आदिवासी साहित्यासाठी दिला जाणारा हा पुरस्कार रद्द करून त्याचा समावेश इतर घटकात केल्याने आदिवासी साहित्याची स्वतंत्र ओळख संपुष्टात येण्याचा धोका निर्माण झालेला आहे. आदिवासी साहित्यिकांना लेखनासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी आदिवासी साहित्याचा पुरस्कार डॉ. गोविंद गारे यांच्या नावाने पुन्हा सुरू करण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळाकडे किरण लोहकरे, डॉ. हनुमंत भवारी व डॉ. अमोल वाघमारे यांनी संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे.

## २. आदिवासी ठाकर समुदायातील नागरिकांना जातीचे दाखले वाटप

आदिवासी ठाकर समाजाच्या समकालीन परिस्थितीचा संशोधनात्मक अहवाल मांडणी व सुमारे ६० आदिवासी ठाकर समाजातील नागरिकांना जातीचे दाखले वाटप कार्यक्रम आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव येथे पार पडला. प्रकल्प अधिकारी जागृती कुमरे, सहायक पोलीस निरीक्षक जीवन माने, आदिम संस्थेचे संशोधक किरण लोहकरे, • किसान सभेचे डॉ. अमोल वाघमारे, उदयसिंह चौधरी, डॉ. हरीश खामकर, योगेश खंदारे, निलेश काळे आदी यावेळी उपस्थित होते..

या अहवालाच्या आधारे असे दिसून आले कि कुटुंबप्रमुखांचा साक्षरता दर ५६ टक्के असून, तो राज्याच्या ६५ टक्केपेक्षा ९ टक्केने कमी आहे. कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न देशाच्या व राज्याच्या सरासरीपेक्षा तीन पटीने कमी म्हणजे २ हजार ३३८ रुपये आहे. मालकीचे घर असले तरी त्यापैकी ९० टक्के कुटुंबांना स्वतःच्या घराखालच्या जमिनी या इतरांच्या मालकीच्या आहेत. रोजगार हमी योजना व आयुष्यमान भारत योजनांबाबत माहिती नाही. ८० टक्के लोकांकडे जॉब कार्ड नाहीत. ठाकर वस्त्यांवर पिण्याचे पाणी, रस्ते, दफनभूमी आदींबाबत समस्या आहेत.

आंबेगाव तालुक्याच्या १३ ठाकरवस्तीतील सुमारे २९८ कुटुंबांचे सामाजिक-आर्थिक अभ्यास आदिम संस्थेच्या वतीने मागील पाच महिन्यांपूर्वी सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये काही मुद्दे समोर आले. यामध्ये ठाकर समाजातील भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण ४० टक्के असून, अल्पभूधारकांचे प्रमाण ५० टक्के आहे.

'आदिवासी कातकरी, ठाकर समाजाचे जे प्रश्न असतील ते सोडविण्यासाठी आदिवासी विकास विभाग व अधिकाधिक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे उपविभागीय अधिकारी सारंग कोडोलकर यांनी सांगितले.'

# ३. अन्नसुरक्षा कायद्याविषयी जनजागृती

न्हावेड (ता. आंबेगाव) येथे एनसीएएस संस्था पुणे, एनएफआय संस्था दिल्ली आणि आदिम संस्था आंबेगाव यांच्या संयुक्त विदयमाने रेशनव्यवस्था, अंगणवाडीत मिळणारा पोषण आहार व शाळेत मिळणार माध्यान्ह भोजन आहार याविषयी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम झाला. त्यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सुनिता गांधी बोलत होत्या, त्या म्हटल्या कि, ‘नागरिकांना अन्नसुरक्षा प्रदान करणारा कायदा निर्माण होऊन अंमलबजावणीविषयक काही अडचणी दिसून येतात. यासाठी अन्नसुरक्षा कायदा सर्व सामान्य लोकांना समजून सांगून त्यांना आपले हक्क व जबाबदारी विषयक अवगत केल्यास या कायद्याच्या अंमलबजावणीमधील अडथळे कमी होण्यास मदत होईल.

या प्रशिक्षणात तिरपाड, डोण, नानावडे, नाव्हेड, पिंपरगणे, कोंढरे, आघाणे व असाणे या गावांतील ६० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमास किसान सभेचे राजू घोडे, आदिम संस्थेचे अविनाश गवारी, बाळकृष्ण गवारी, दिपक वालकोळी, बाबूराव आंबवणे, पुंडलिक असवले उपस्थित होते.

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात रेशन खराब येणे, रेशन नियमित न मिळणे, पुरेसे रेशन न मिळणे, दक्षता समित्या सक्रिय नसणे, अंगणवाडीमध्ये मिळणाऱ्या पोषक आहारात भ्रष्टाचार होणे यांसारख्या समस्या दिसून येतात.

याबाबत अन्न अधिकार कायदा व त्या अंतर्गत नागरिकांना मिळालेले विविध हक्क याविषयी समाजात पुरेशी जाणीव जागृती दिसून येत नाही, या पार्श्वभूमिवर या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले होते.

किसानसभेचे राजू घोडे यांनी यावेळी उपस्थितांना पेसा कायदा, अंतर्गत गावातील विविध समित्यांची कार्ये व नागरिक म्हणून आपल्या जबाबदाऱ्या आणि हक्क याविषयी मार्गदर्शन केले. एनसीएएस संस्थेच्या स्नेहा प्रभा, श्रीमती सप्तमी यांनी अन्न सुरक्षा कायदयाअंतर्गत येणाऱ्या विविध योजना व योजनांवर देखरेख करणाऱ्या समित्या व यां समित्यांची रचना, कार्य याबाबत माहिती दिली.

# वर्षभरातील साध्य बाबी

या वर्षभरात संस्थेने मागासवर्गीय व दुर्लक्षित समाजाचे प्रश्न आणि त्या समुदायाचे वास्तव प्रशासनासमोर आणून दिले, यावरच संस्थेने आपले काम न थांबवता प्रशासनाला वेळोवेळी सहकार्य करून आदिवासी ठाकर आणि कातकरी समुदायाचे कागदपत्राची समस्या सोडविण्यात मदत केली. कोविड काळात किराणा साहित्य वाटप करण्यात आले. यामधून संस्था लक्षणीय घटका पर्यंत पोहचली.

१. १०० पेक्षा जास्त पौढ महिला साक्षर झाल्या.
२. १० गावांत ग्रंथालय उभी करण्यात आली, या माध्यमातून या गावातील सुमारे ५००० पेक्षा जास्त लोकसंख्येपर्यंत संस्था पोहचली.
३. कोविड काळात गावोगाव केलेल्या जाणीवजागृती उपक्रमामुळे संस्था तालुक्यातील ६४ गावांत कोरोनाचा प्रादुर्भाव अत्यल्प प्रमाणात झाला.